# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.08.2024** **वार – बुधवार**

---

**<u>वारसा</u>**

प्राचीन वारसा संवर्धन हे केवळ एखाद्या प्राचीन वस्तूचं संवर्धन नसून ते खऱ्या अर्थानं ज्ञानाचं जतन आणि संवर्धन आहे असं मत इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राचे अधिष्ठाता प्राध्यापक प्रताप आनंद झा यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेमध्ये प्रतिबंधात्मक संवर्धन या विषयावर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>भारत बंद</u>**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या उपवर्गीकरण आणि आर्थिक निकषासंबंधी सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाच्या विरोधात आंबेडकरी चळवळीतील संघटनांनी आज पुकारलेल्या भारत बंदनिमित्त पुण्यात पदयात्रा काढण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांना निवेदन देण्यात आलं.

**<u>साथीचे आजार</u>**

पुण्यातील कोंढवा, महमंदवाडी परिसरात डेंग्यू, चिकुनगुनियासह साथीच्या आजारांच्या रूग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळं महापालिकेच्या दवाखान्यांसह खासगी रूग्णालयांत रूग्णांची गर्दी वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आरोग्य प्रशासन प्रार्दुभाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करत आहे अशी माहिती सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉक्टर सुर्यकांत देवकर यांनी दिली.

**<u>मंकीपॉक्स</u>**

मंकीपॉक्स या संसर्गजन्य रोगावरील लस संशोधित करण्याचं काम सध्या पुण्यातील सिरम संस्थेमध्ये सुरु आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात देखील या आजाराचा प्रादुर्भाव झाल्याची नोंद

असून या आजारानं ग्रस्त व्यक्तीच्या संपर्कात आल्यानं देखील या आजाराचा प्रसार होत असल्याचं दिसून आलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं देखील या आजारासंबंधी धोक्याची सूचना दिली आहे.

**<u>साखर संकुल</u>**

पुणे जिल्हयातील शेतक-यांनी सरासरी उत्पादकतेपेक्षा अधिक उत्पादन घेतलं पाहिजे अशी अपेक्षा कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी पुण्यात व्यक्त केली. पद्मश्री पुरस्कारप्राप्त डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जन्मदिनानिमित्त साखर संकुलात राज्यस्तरीय पीक स्पर्धाविजेत्या पुणे जिल्हयातील शेतक-यांचा गौरव करताना ते बोलत होते. कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांनी पुढे येण्याचं आवाहनही कृषी आयुक्तांनी केलं.

**<u>ससून-कॅमेरे</u>**

कोलकात्याच्या घटनेनंतर आता ससून रुग्णालयात कुंपणाच्या भिंतीची उंची वाढवण्याचा तसंच कायमस्वरूपी बंद असलेल्या प्रवेशद्वारांऐवजी भिंत घालण्याचा विचार आहे. रुग्णालयाची जुनी आणि नवीन इमारतीदरम्यान अंतर मोठं असल्यानं दिवे आणि 100 अतिरिक्त कॅमेरे लावण्यात येणार आहेत. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लपा जाधव आणि अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी ही माहिती दिली. राज्यातील 23 सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमधील सर्वच निवासी डॉक्टरांनी आठवड्यापासून संप पुकारला आहे.

**<u>पिंपरी चिंचवड मनपा</u>**

पिंपरी चिंचवड शहरात उभारण्यात येणाऱे विकास प्रकल्प, पायाभूत सुविधा आणि त्यांचे शहराच्या पर्यावरणावर होणारे परिणाम यांचं मुल्यांकन करणारा सन 2023-24 चा 'पर्यावरण सद्यस्थिती अहवाल' आयुक्त तथा प्रशासक शेखऱ सिंह यांच्याकडे विशेष बैठकीत सादर करण्यात आला. नोंदणीकृत वाहनांच्या संख्येत गतवर्षीच्या तुलनेत सुमारे 16 टक्क्यांनी वाढ, शहरातील 79 टक्के नागरिक साक्षर आहेत, निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी 38 टक्के ओला कचरा असतो अशा नोंदी या अहवालात आहेत.

**<u>मानवता</u>**

नैतिक मूल्यांचं अधःपतन होत असताना, वैयक्तिक लालसेपोटी सामान्य माणसाच्या वेदनेचा विसर पडलेल्या या काळात मानवतेच्या आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी विचारवंतांनी ठाम भूमिका घेत सत्तेच्या नव्हे, तर सत्य आणि मानवकल्याणाच्या बाजूनं बोलायला हवं असं परखड मत आज पुण्यात ज्ञानवंतांनी मांडलं. डॉक्टर डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि लोकशाहीसाठी समंजस संवाद यांच्यातर्फे 'ज्ञानवंतांचा सत्कार' सोहोळा आयोजित केला होता. सरस्वती सन्मानप्राप्त लेखक डॉक्टर

शरणकुमार लिंबाळे, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य डॉक्टर सुनीलकुमार लवटे, गांधी अभ्यासक प्राचार्य डॉक्टर विश्वास पाटील आणि लेखक प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांचा सत्कार कुलपती डॉक्टर पी. डी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. ज्येष्ठ नेते उल्हास पवार आणि ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यावेळी उपस्थित होते.

**ज्योतिष**

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय आणि प्राध्यापक रमणलाल शहा ज्योतिष ॲकॅडमीद्वारे आयोजित 42 व्या अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशनातील आज दुसऱ्या दिवशी विविध सत्रं, पुरस्कार वितरण, चर्चा, पुस्तक प्रकाशन आदी कार्यक्रम पार पडले. नाशिकच्या शुभांगिनी पांगारकर यांना ग्रहांकित जीवनगौरव तर शीलाताई पाचारणे स्मृती आदर्श ज्योतिष शिक्षिका पुरस्कार गौरी केंजळे यांना देण्यात आला.

**पाणी**

पुणे महापालिकेच्या पर्वती, वडगाव, लष्कर आणि एसएनडीटी पाणीपुरवठा केंद्रातील दुरुस्तीच्या कामामुळं उद्या गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा आणि कमी दाबानं पाणीपुरवठा होईल असं महापालिकेतर्फे कळवण्यात आलं आहे.

पुण्यात थोड्या वेळापूर्वी काही भागांमध्ये पावसाच्या सरी पडल्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**